PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 6, ISSUE 3

# बारथॉलॉम्यु झिगेंनबालग :- प्रोटेन्स्टंट मिशनरी चळवळीचा कर्ता

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग,
सामाजिक शास्त्रे प्रशाळा,
क ब चौ उ म वि, जळगाव,
**महाराष्ट्र भारत**

बारथॉलॉम्यु झिगेंनबालग हा भारतात येणारा पहिला प्रोटेन्स्टंट मिशनरी झाला.पण खरे पाहता त्याही अगोदर भारतात इसनाच्या पहिल्या शतकातच प्रभू येशूच्या शिष्य सेंट थोमस हा केरळचा मलबार किनाऱ्यावर येऊन गेला होता.त्यानेच भारतात ख्रिस्ती धर्माची पताका रोवली. बारथॉलॉम्यु झिगेंनबालग हा भारतात आला तेव्हा भारत ब्रिटीश सत्तेच्या गुलागीरीत होता.जातीव्यवस्था मजबूत होती.समाजात अनेक अनिष्ट प्रथा होत्या.हिंदुस्थान संस्थानाचा नावावर वेगवेगळ्या प्रांतातविभागलेला होता.अशा परिस्थितीवर मात करून ख्रिस्ताची सुवार्ता देण्यासाठी भारतीय भाषा आणि संस्कृतीचा बारथॉलॉम्यु झिगेंनबालग याने अवलंब केला.आणि स्थानिक भाषेत बायबलचे भाषांतर केले.नवीन यरुसालेम म्हणून चर्चची स्थापना केली.रोजगाराचा संधी लोकांसाठी उपलब्ध करून देण्याच्या पूर्ण प्रयत्न केला.भारताचा आधुनिक समाजसुधारणेचा पायात आपले महत्वपूर्ण योगदान दिले.

**बारथॉलॉम्यु झिगेंनबालग यांचा सुरुवातीचा काळ:-**

"१७०५ च्या मार्च महिन्यात एके दिवशी संध्याकाळी डेन्मार्कचा राजा चौथा फेडरीक हा परदेशातल्या वसाहतीतुन आलेले सरकारी टपाल चाळीस होता.या टपालातल्या एका पत्राने त्याचे चित्त वेधून घेतले.हे पत्र त्रिकोबारहुन आलेले होते .त्रिकोबारच्या वसाहतीतल्या एका शिपायाच्या विधवेने राजाला पेन्शन देण्याची विनंती केली होती.याचे कारण असे की त्या गावातल्या एतद्देशीय लोकांशी झालेल्या चकमकीत तिचा नवरा व मुलगा असे दोघे ठार झाले होते.ह्या बाईची फार गरिबी होती व तिला दुःखही झाले

होते.म्हणून तिने पेन्शन देण्याची याचना राजाजवळ केली होती .हे पत्र वाचून राजाचे अंतःकरण द्रवले.या अभागी स्त्रीच्या दु:स्थितीच्या विचार करीत असताना,ज्या ख्रिस्तीतर-विधर्मी लोकांनी हे भयंकर कृत्य केले होते.त्यांच्या स्थितीचा व गरजांचा विचारही राजाच्या मनांत डोकावला.आपण त्यांच्यासाठी काय करीत आहो? असा त्याने स्वतःच्या मनालाच प्रश्न विचारला .* यात देवाचाच हात होता खास! त्यानेच त्याचे डोळे उगडून त्याला मार्ग दाखविला खास! "आपण व आपले लोक भारतातून अलोट संपत्ती आणीत आहो.तिचा मोबदला म्हणून हिंदू लोकांना शुभवार्तारुपी संपत्ती देण्याच्या बाबतीत आपण काय करीत आहो बरे? त्याचक्षणी त्याने पश्चाताप केला आणि तातळीने आपल्या डॉ लुटकेन नावाच्या पाळकाला बोलावून घेतले.राजाचा हा निश्चय ऐकून त्याला सानंदाश्रय वाटले. "या कामाला लायक असा मिशनरी कोठे सापडेल? म्हणून राजाने विचारले,तेव्हा या वयोवृद्ध सद्गृहस्थाने उत्तर दिले."हा पाहा,मी महाराजपुढे उभा की; मलाच पाठवावे." पण त्याला पाठविणे शक्यच नव्हते,त्याचे वय झालेले होते.यामुळेच या धाडसाला तो अपात्र ठरवावा लागला.हे थोर कार्य करायला लायक लोक पाहण्याची आज्ञा त्याला झाली व तिच्यावरून त्याला समाधान मानून घ्यावे लागले. युरोपातल्या सुधारलेल्या मंडळ्याच्या इतिहासातल्या नवयुगप्रवर्तक योजनेला कारणीभूत झालेली ही महत्वाची मुलाखत आटोपली.''१ अशा प्रकारे बारथॉलॉम्यु झिगेंनबालग याचा भारतात येण्याच्या मार्ग मोकळा झाला.त्याने भारतात येऊन समाजसुधारणेचा नवा प्रवाह सुरु केला.

**बारथॉलॉम्यु झिगेंनबालग यांचे भारतातील मिशनरी कार्य:-**

इरस्मसने आपले पुस्तक उपदेशाची कला नावाच्या उत्कृष्ट ग्रंथात स्पष्टपणे सांगितले आहे मिशनरी वृत्ती किती महत्वाची आहे आणि ती एकदा उत्पन्न झाली की तिला कोणीही थांबवू अथवा थोपवू शकत नाही.

> *"मी तुम्हाला एक बिकट कार्य करायची विनंती करतो.ते बिकट असले,'तरी ते अत्यन्त श्रेष्ठ व उच्च आहे.या पवित्र कार्यात प्राणार्पण करायला मी लायक आहे.असे देवाला वाटले असते,तर माझ्या मनासारखे झाले असते.आज मी झिजून मारणाऱ्या पंथाला लागलो आहे व असह्य यातना भोगीत आहे.त्यापेक्षा हे मरण किती चांगले! सत्यस्वरूप प्रभूंचे वचन गाजविणाऱ्याला वधस्तंभ सापडायला केव्हाही व कोठेही अडचण पडत नाही."२*

ही मिशनरी वृत्ती तयार व्हायला धर्मसुधारणानंतर अनेक वर्षे लोटली गेली.पण ती जोराने फोफावली.शोधाशोध सुरू असतांना डॉ लुटकेन यांचा मित्र लंगे यांनी ही शोध संपविली आणि त्याच्या शिफारशीवर बारथॉलॉम्यु झिगेंनबालग व त्याच्या सहकारी हेंटिक प्लुटशो अशा दोन जर्मन पाळकांची निवड झाली. बारथॉलॉम्यु झिगेंनबालग यांचे पाचारण झाले तेव्हा त्याचे वय २२ वर्षाचे होते.१७०६ साली जुलैच्या ६ तारखेला,हे मिशनरी असलेल्या जहाजाने त्रिकोबार येथे नांगर टाकला.

> *''त्रीकोबार हा लहानसा प्रदेश डेनिश लोकांनी आपल्या वसाहतीसाठी तंजावरच्या राजापासून विकत घेतला.झिगेंनबालगने पाच वर्षात भारतीय भाषांतले पहिले भाषांतर*

> *तामिळ भाषेत १७१५ मध्ये छापले.ते बायबलच्या नवा कराराचे या भागातले पहिले पुस्तक मतयकृतशुभवर्तमान (Gosple of St.Matthew) होते."३.*

बारथॉलॉम्यु झिगेंनबालग याचे योगदान फक्त समाजसुधारणेतच नाही तर साहित्याच्या माध्यमातून देखील त्यांनी आपले योगदान दिले.त्यांनी तयार केलेला स्थानिक भाषेतील शब्दकोशाने एक नवा इतिहास रचला.

> *"झिगेंनबालग यांच्या इतिहास एक शब्दकोश रचनाकार,व्याकरण तज्ञ,ईश्वरविज्ञान तज्ञ म्हणून व त्या क्षेत्रातील एका अग्रगण्य संस्थापक म्हणून हेवा करण्याजोगे आहे.फेब्रीशियस,हेनियस,आणि ग्राउल यांनी श्रेष्ठ दर्जाचे साहित्य झिगेंनबालग ह्याच्याच साहित्यावर अधिष्ठित असे केलेले आहे.त्यानेसुद्धा डॉ वर्षाच्या आतच मलबारी शब्दकोशासाठी २०,००० शब्द आणि शब्दोच्चार संग्रहित केले होते.त्यानंतर त्यांनी तामिळ कवीच्या सहाय्याने जवळपास ७०,००० शब्दसाठा असलेल्या काव्यात्मक शब्दकोशावर काम केले आहे."४*

विल्यम केरीचा अगोदर असे साहित्यिक योगदान फक्त फादर थोमस स्टीफंस आणि काही निवडक मिशनरींनी दिले होते.पण विल्यम केरीला मिशनरी चळवळीचा कळस चढविण्यासाठी बारथॉलॉम्यु झिगेंनबालग याने अनेक पायऱ्या तयार करून दिल्या होत्या यात दुमत नाही.

**निष्कर्ष:-**

फेडरीक चौथा याच्या पश्चाताप वृत्तीने प्रोटेन्स्टंट मिशनरी चळवळीचे द्वार भारतात उघडे झाले. ख्रिस्ती व्यक्तीने पश्चाताप वृत्तीने घटनेकडे पाहिल्यास सत्य प्रकाशित होते. बारथॉलॉम्यु झिगेंनबालग याची २२ व्या वर्षीच धर्मगुरू म्हणून निवड झाली.ख्रिस्ती मिशनरी चळवळीतील हि त्याची योजना अदभूत रिते घडली आणि तिच्या परिणाम सार्वत्रिक झाला. बारथॉलॉम्यु झिगेंनबालग हा ख्रिस्ताचा सिहासारख्या खरा तरुण होता.आजचा तरुण वर्ग स्वतःला बारथॉलॉम्यु झिगेंनबालग सारखा होकार देत आहे का?ही घटना भारतातील असंख्य लोकांच्या तारणासाठी कारणीभूत ठरली.

## संदर्भग्रंथसूची:-

१) भारतात आलेले प्रेषित,जे.एन.ओग्वली.बॉम्बे ट्रक अंड बुक सोसायटी.मुंबई पृ क्र-१९६-१९७
२) भारतात आलेले प्रेषित,जे.एन.ओग्वली.बॉम्बे ट्रक अंड बुक सोसायटी.मुंबई पृ क्र-१९३-१९४
३) मराठी ख्रिस्ती साहित्य उगम आणि विकास.प्रा डॉ सुभाष पाटील.चेतक बुक्स पब्लिकेशन.प्रथमावृत्ती.२०१६.पृ क्र-४४
४) भारत घडो.डॉ बाकू के वर्गीस.डब्लू.ओं.सी.पब्लिशिंग.मुंबई.पृ क्र-२९